Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0017

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# महायोगी श्री. अरविंद घोष

डॉ. विलास आत्माराम देऊलकर
सहयोगी प्राध्यापक
बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग
ई.मेल - vadewoolkar@gmail.com

**सारांश -**

शिक्षण म्हणजे सुक्ष्म क्षमता बाहेर आणणे आणि त्याचे संगोपन करणे याशिवाय दुसरे काही नाही. स्वत:शी एकरूप होणे व्यक्तीने समाज, देश आणि मानवतेशी सुसंवादीत राहणे. स्वत: एक संपूर्ण अस्तित्व किंवा अविभाज्य मानव बनवणे. श्री. अरविंद हे एक महान विचारवंत खात्रीशीर तर्कशुद्ध तात्विक प्रतिभावान होते. श्री. अरविंद यांना भारतीय राष्ट्रवादाचे पैगंबर म्हटले जाते. श्री. अरविंदांनी स्वराज्य हे आपले राजकीय उद्दिष्ट ठेवले होते. स्वराज्य हा शब्द वेदातून आला आहे. याचा अर्थ नैतिक आणि अध्यात्मिक स्वातंत्र्य आहे. श्री.अरविंदांच्या मते राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने अंतर्गत स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहेत. श्री. अरविंद हे विसाव्या शतकाच्या सुरूवातीतील राष्ट्रवादी चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक आहेत. त्यांचे बहुतेक लेखन वंदे मातरम व कर्मयोगी वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले आहे.

किवर्ड- अरविंद, योगी

**प्रस्तावना -**

विसाव्या शतकातील हिंदूस्थानातील सुशिक्षित लोकांवर अरविंदांच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा जितका परिणाम झाला तितका फार थोडया विचारवंताचा झाला आहे. आधुनिक हिंदूस्थानच्या सुशिक्षित तरूणाला घडविण्याचे महत्त्वाचे कार्य अरविंदांनी केले. स्वत: अरविंद हे प्रखर राष्ट्रभक्त होते आणि हिंसक क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्याशिवाय हिंदूस्थानातील ब्रिटीश सामाज्य लयाला जाणार नाही असे त्यांना तीव्रतेने वाटत होते. यादृष्टीने त्यांनी आपल्या जीवनाच्या प्रारंभी गुप्त क्रांतीकार्यात भाग घेतला आणि ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर खटले भरून त्यांना शिक्षाही दिली. पलीकडे अरविंद योगमार्गाकडे वळले आणि त्यांना ईश्वरी साक्षात्कार होऊ लागले. म्हणून अरविंदांनी पॉंडिचरीला जाऊन एकांतवास पत्करला आणि कालांतराने त्या ठिकाणी आश्रम स्थापन करून तिथेचे कायमचे वास्तव्य केले.

**अल्पपरिचय :**

कलकत्ता येथील एका सुसंस्कृत कुटुंबात अरविंदांचा १५ ऑगस्ट १८७२ रोजी जन्म झाला. वडील कृष्णधनबाबू हे व्यवसायाने डॉक्टर होते. मुलांना पाश्चिमात्य शिक्षण मिळावे म्हणून त्यानी

https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0017
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

अरविंदांना वयाच्या ७ व्या वर्षी इंग्लंडात पाठविले. इंग्लंडमधील मुक्कामात त्यांनी लॅटीन, ग्रीक, इंग्रजी भाषांवर प्रभुत्व मिळविले. आय. सी. एस. ची परीक्षा ग्रीक आणि लॅटिनमध्ये सर्वाधिक गुण मिळवून ते पास झाले. तथापि अश्वारोहणात त्यांना अपयश प्राप्त झाले. नंतर दुसरी संधी मिळूनही ते आय. सी. एस. च्या परीक्षेला बसले नाहीत. केम्ब्रिजला असताना ते "इंडियन मजलिस" चे कार्यवाहक होते आणि त्यांनी मजलिसमध्ये क्रांतिकारक भाषणे करून भारताने सशस्त्र उठाव करूनच स्वातंत्र्य मिळवावे, असे मत मांडले. इंग्रज सरकारची नोकरी न करण्याचा निर्णय घेऊन ते १८९३ मध्ये भारतात परतले आणि बडोदा संस्थानच्या नोकरीत रूजू झाले.

बडोद्याला ते १९०७ पर्यंत होते. १९०१ मध्ये त्यांचा मृणालिनीदेवींशी विवाह झाला. पुढे अरविंदांनी पाँडेचरीस प्रयाण केल्यानंतर त्यांचे इकडे बडोद्यास निधन झाले. बडोद्याला त्यांनी फ्रेंच आणि इंग्रजीच्या अध्यापनाचे कार्य केले. याच वेळी त्यांच्या योगसाधनेलाही प्रारंभ झाला. वेदांचा अभ्यास त्यांनी ह्याच वेळी केला. मुंबईच्या इंदुप्रकाशा'त लेख लिहून ते आपली राजकीय मते मांडू लागले. बंगालमधील क्रांतीकारक चळवळीचे अरविंद हे एक प्रवर्तक होते. ते टिळकांचे अभिमानी आणि जहालपक्षाचे पुरस्कर्ते होते. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळी त्यांनी कलकत्त्याला "नॅशनल कॉलेजचे" प्राचार्यपद स्वीकारले. सुरत काँग्रेसच्या वेळी (१९०७) त्यांनी लो. टिळकांना पूर्ण पाठिंबा दिला.

'वंदेमातरम' ह्या वृत्तपत्रात त्यांनी जे लेख लिहिले, त्यांवरून सरकारने त्यांच्यावर खटला भरला परंतु त्यांच्यावरील आरोप सिद्ध होऊ शकला नाही. १९०८ मध्ये अलीपूर बाँब खटल्यात इतर ३८ क्रांतीकारकांबरोबर अरविंदबाबूंना पकडण्यात आले. एक वर्षपर्यंत त्यांना तुरुगात डांबण्यात आले. चित्तरंजन दास यांनी अरविंदातर्फे हा खटला चालविला. यातून १९०९ मध्ये त्यांची सुटका झाली. आपल्या बचावाच्या भाषणात त्यांनी "मानवतेचे पुजारी" असे अरविंदांचे वर्णन केले. सुटका झाल्यानंतरसुद्धा त्यांनी आपले राजकीय कार्य तसेंच चालू ठेवले. १९१० मध् ये ब्रिटिश सरकारने त्यांना पुन्हा अटक करण्याकरिता वॉरंट काढले. ह्या वेळेपावेतो अरविंदांनी योगशास्त्रात बरीच प्रगती केली होती. त्यातील अत्युच्च ध्येय गाठावयाचे असल्यास शांत ठिकाणी जाऊन योगसाधना कर असा त्यांना ईश्वरी आदेश आला. म्हणून ते पाँडेचरीस १९१० मध्ये निघून गेले.

पाँडेचरीला मुक्कामाला असतांना त्यांना दिव्य साक्षात्काराचा आणि पूर्ण प्रसन्न शांतीचा अनुभव आला. तेव्हापासून जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी बदलून गेली. ते राजकारणातून पूर्णपणे निवृत्त झाले. यानंतर त्यांनी साहित्य आणि तत्त्वज्ञानास वाहून घेतले. या कामात त्यांना पॉल रिचर्ड आणि त्यांच्या पत्नी (पलीकडे ह्याच 'मदर' या नावाने प्रसिद्धीस आल्या.) या दोघांनी अतिशय मदत केली. १९१४ च्या सुमारास या दाम्पत्याच्या मदतीने अरविंदांनी "आर्य" नावाचे भारतीय समाजसुधारक मासिक चालविले. त्यात त्यांनी तत्त्वज्ञान आणि साहित्य ह्यासंबंधी अनेक लेख लिहिले. अरविंदाचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यापैकी "द लाईफ डिव्हाईन", "द

फाऊंडेशन ऑफ इंडियन कल्चर", 'द सिंथेसिस ऑफ योग", "एसेस ऑन दि गीता" हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. अरविंदांचे "सावित्री" हे महाकाव्यवही विशेष प्रसिद्ध आहे. १९२६ पासून अरविंदांनी एकान्तवास पत्करला. माताजीद्वारेच आता बाहय जगताशी संपर्क साधल्या जाऊ लागला. १९२६ पासून पाँडेचरीला आश्रम विशेष प्रसिद्धीस आला. अरविंदांनी आश्रमाची सर्व व्यवस्था माताजींकडे सोपविली. ५ डिसेंबर १९५० रोजी हया महापुरुषाने महासमाधी घेतली. एक अत्यंत थोर महामानव काळाच्या पडद्याआड गेला.

<u>अरविंदांचे तत्वज्ञान</u> -

विसाव्या शतकातील मानवाकरिता अरविंदांनी एक तत्वज्ञान समोर मांडले. त्यांच्या तत्वज्ञानात पौवार्त्य आणि पाश्चिमात्य विचारसरणीचा समन्वय करण्यात आलेला आपल्याला आढळून येतो. त्यांच्या मते, व्यवहार आणि तत्वज्ञान दोन्हीही खरी आहेत. जग खरे आहे म्हणून जगातील समस्याही खऱ्या आहेत. या समस्यांचे उत्तर जगाविषयीच्या मर्यादित विचाराने दिले जाते त्यामुळे ते अपुरे ठरते. व्यक्ती आणि विश्व यांच्या मुळाशी जे चैतन्य आहे त्याच्या जाणीवेतून आणि विकासातून उत्तर दिल्यास त्या सर्व समस्या नाहीशा होतील. अरविंदांचे तत्वज्ञान पूर्णपणे अद्वैत स्वरूपाचे होते आणि ते पुर्णाद्वैत म्हटले गेले.

अरविंद घोष हे गूढ अध्यात्मवादी विचारवंत होते. त्यांचा हा अध्यात्मवाद त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचारांमधून व्यक्त झालेला आहे. त्यांच्या सिद्धांतानुसार कोणत्याही घटनेमागे किंवा घडामोडीच्या स्वरूपात ईश्वरी इच्छाच कार्य करीत असते. हया घटना आणि घडामोडीतून सामाजिक विकास घडून येतो. वरवर पाहता हया घटना स्थलकालानुसार निरनिराळ्या वाटतात परंतु सामाजिक विकासाच्या दृष्टीने ढोबळमानाने विचार करता आपल्याला काही निश्चित अवस्था दाखवू शकतात.

अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये समाजामध्ये प्रतिकात्मक मनोवृत्ती प्रभावी असते. या अवस्थेमध्ये समाजजीवनावर धार्मिक कल्पनांचा प्रभाव असतो. त्यानंतरच्या समाजाच्या अवस्थेत नैतिकता प्रधान असते. सामाजिक व्यवहारांकडे मनोवैज्ञानिक आणि नैतिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. तिसऱ्या अवस्थेमध्ये समाज परंपरामूलक अवस्थेत येतो. हया अवस्थेत रूढी आणि परंपरा यांना फार महत्त्व येते. आशयाकडे दुर्लक्ष होते. हया अवस्थेत शेवटी मूलभूत विचार करणारी माणसे समोर येतात आणि वैचारिक स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता ती प्रचलित व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारतात.

<u>धर्मविषयक विचार</u> -

अरविंदांचे जे हिंदुधर्मविषयक विचार होते ते अत्यंत उदारमतवादी होती. अरविंदांना हिंदुधर्माचा अतिशय अभिमान होता. हिंदु धर्म सर्व श्रेष्ठ आहे, असे ते आग्रहाने सांगत. परंतु त्यांच्या हिंदुधर्माची कल्पना हिंदुस्थानपुरतीच मर्यादित नव्हती. त्यांच्या मते हिंदु धर्म वैश्विक

https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0017

धर्म होता. इतर सर्व धर्म-कल्पनांना आपल्यात समावेश करण्याची हिंदु धर्मात ताकद आहे, असे मत आग्रहाने मांडत असत.

**अरविंदांचे राजकीय विचार -**

श्री. अरविंद हे कट्टर राष्ट्रवादी होते. राष्ट्रवाद म्हणजे राजकारण नसून ती एक श्रद्धा आहे, तो एक धर्म आहे, असे मत ते आग्रहाने मांडत असत. आपल्या जीवनाच्या अखेरीला त्यांनी राष्ट्रवाद एक सनातन धर्म आहे, असे मत त्यांनी मांडले. हिंदु धर्मास अरविंद सनातन धर्म म्हणत असत आणि सनातन धर्म म्हणजे वैश्विक धर्म अशी त्यांची कल्पना होती. यावरून त्यांची राष्ट्रवादाची कल्पना संकुचित नव्हती असे आपणाला दिसुन येते. खरे स्वातंत्र्य आणि समता ह्यांच्याशिवाय व्यक्तीची किंवा समाजाची उन्नती होत नाही असे त्यांना ठामपणे वाटत होते. भूतकाळच्या आहारी न जाता भूतकाळचा समतोलपणे विचार करा असाच त्यांचा आग्रह होता.

श्री.अरविंदाचे राजकीय विचार राजकीय वास्तव्याचा चिंतनातून आणि राजकारणातील प्रत्यक्ष सहभागातून व्यक्त झाले आहे. राजकीय विषयांना आपल्या विचारांमध्ये व लेखनामध्ये प्राधान्य दिले. असा त्यांचा कालावधी अत्यल्प होता. असे असले तरी आधुनिक भारतीय राजकीय विचारांचा क्षेत्रात त्या विचारांनी कमालीची भर घातली आहे. भारतीय जनतेने परकीय मालावर बहिष्कार टाकल्यास अंहिसेच्या मार्गाने इंग्रजी सत्तेशी मुकाबला करता येईल. इंग्रजी सत्तेचे खरे सामर्थ्य त्याने चालविलेल्या व्यापारी धोरणाव्दारे भारतीयांचे शोषण चालले त्यामध्ये आहे. त्यामुळे इंग्लंड मधून भारतात येणाऱ्या मालावर बहिष्कार टाकल्यास इंग्रजांच्या नाडया आपोआप आवळल्या जातील. म्हणजेच हिंसेच्या किंवा क्रांतीच्या मार्गाचा अवलंब न करता भारतातील परकीय सत्तेचा प्रतिकार करता येईल.

**शिक्षणविषयक विचार -**

प्रत्येक माणसाने शिक्षणाच्या माध्यमातून आत्म्याचे महत्त्व जाणून घेतले पाहीजे व आत्मिक शक्तीचा विकास केला पाहीजे असे प्रतिपादन श्री.अरविंद यांनी केले. त्यांच्या मते आत्मिक शक्तीच्या विकासामुळे व्यक्ती परमेश्वराच्या अगदीच निकट पोहचू शकेल. परंतू शिक्षणाची नितांत गरज आहे. आत्मिक विकास साधणे व परमात्म्याशी संबंध निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. असे योगी अरविंदांनी म्हटले आहे. त्यांनी ५ ज्ञानेद्रियांबरोबरच मन या ज्ञानप्राप्तीच्या साधनांचा समावेश इंद्रियात केला आहे. त्यांच्या मते मनाव्दारे बुध्दीशी संपर्क साधता येतो. शारिरीक शिक्षण हे सुध्दा शिक्षणाचे ध्येय आहे. असे मत त्यांनी मांडले आहे.

**निष्कर्ष**

थोडक्यात, अरविंदांची प्रेरणा भारतीय तत्वज्ञानातून आलेली होती. ऋषीमुनींची स्फूर्ती ती अरविंदांची स्फूर्ती होती. त्यांचे तत्त्वज्ञान सर्वसमावेशक होते. शंकराचार्य आणि अरविंद यांच्या तत्वज्ञानात विशेष फरक होता असेही दिसून येत नाही. त्यांच्या तत्वज्ञानामुळे हिंदुस्थानातील सुशिक्षितांची राष्ट्रनिष्ठा, धर्मग्रंथांवरील प्रेम कायम राहिले. अरविंदांनी सामाजिक सुधारणांवर मात्र

तितकासा जोर दिलेला आढळत नाही. हिंदुस्थान खऱ्या अर्थाने अध्यात्मिक झाल्यास भारतीय समाजातील सर्व दोष आपोआपच गळून पडतील, असे त्यांना वाटत असावे.

संदर्भ -

1. डॉ.शाम बहादुर वर्मा : श्री.अरविंद विचार दर्शन, अरविंद प्रकाशन, दिल्ली १९७४
2. प्रा.ना.ग.पवार : शिक्षण क्षेत्राातील विचारवंत, नुतन प्रकाशन, पूणे १९७८
3. नवजात : श्री. अरविंद, नॅशनल बुक स्ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली १९७३
4. डॉ. अनिल कठाणे : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विदयाबुक पब्लिशेअर्स, औरंगाबाद १९१८
5. डॉ.गजानन ना. जोशी : पूणे विदयापीठ प्रकाशन, १९८२
6. महायोगी अरविंद : रं. दिवाकर, ( अनुवाद ) शि.ष,आपटे, मुंबई १९५६
7. केशव र. काशिकर : पुर्णयोगी श्री. अरविंद चरित्र आणि कार्य, उषा प्रकाशन सुरत १९७२